नि.फौ.ख.क्र.१५५/२०१९ MHNB060017692019

सरकार वि. अशोक सामुद्रे नि.क्र.४२/क

## फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे आरोपीचे निवेदन

आरोपी क्र.१ चे नाव: अशोक सजन सामुद्रे,

वय : ४५ वर्षे, धंदा : मजुरी

राहणार : छोटा माळीवाडा, नंदुरबार ता. जि. नंदुरबार.

(सूचना : तुम्हाला असे सांगण्यात येते की, कोणताही जबाब देण्यास तुम्ही बांधील नाहीत. तुम्हाला असे सांगण्यात येते की, न्यायालयाने विचारलेल्या कोणत्याही प्रश्नाचे उत्तर देण्यास तुम्ही बांधील नाहीत. तुम्हाला असे सांगण्यात येते की, कोणत्याही प्रश्नाचे आपण जे उत्तर द्याल ते या खटल्याच्या कामी पुराव्याचा भाग म्हणून विचारात घेतले जाईल. जरी आपण कोणत्याही प्रश्नाची खोटी उत्तरे दिलीत तरी त्याबद्दल आपल्यावर लगेच कोणतीही फौजदारी कारवाई केली जाणार नाही. परंतु आपण दिलेल्या उत्तरांवरून न्यायालय योग्य ते अनुमान काढेल.)

प्र.क्र. १ तुम्ही अभियोग पक्षाचा पुरावा ऐकला काय व तो तुम्हाला समजला काय ?

उत्तर. होय.

प्र.क्र. २ अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.१ ज्योती अशोक सामुद्रे हिच्या साक्षेत असे आले आहे की, आरोपी क्र.१ हा तिचा पती, क्र.२ व ३ सासु सासरे, आरोपी क्र. ४ व ५ चुलत सासु सासरे, आणि आरोपी क्र. ६ व ७ हे ननंद व नंदोई आहेत. सन २००८ साली तिचे तुम्ही आरोपी क्र. १ सोबत प्रकाशा येथे लग्न झाले होते. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खरे आहे.

प्र.क्र. ३ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, लग्नानंतर ती तुमच्या घरी नंदुरबार येथे नांदायला गेली. सुरुवातीला दोन महीने तुम्ही आरोपीने तिला चांगली वागणुक दिली. त्यानंतर तुम्ही आरोपीने तिच्याकडे चारचाकी गाडी खरेदी करण्यासाठी ५०,०००/– रुपयाची मागणी केली. परंतु, तिच्या वडीलांची पैसे देण्याची परीस्थीती नसल्याचे तिने कथन केले आहे. याबाबत तुम्हाला

12/08/18

काय सांगावयाचे आहे ? ?

उत्तर. हे म्हणणे खरे नाही.

प्र.क्र. ४ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, त्यामुळे तुम्ही आरोपी क्र. १ तिला मारहाण करुन भांडण करीत होते. तसेच तिला पैसे घेऊन यायला सांगत होते. त्यामुळे सन २०१८ मध्ये ती माहेरी आली. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खरे नाही.

प्र.क्र. ५ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, त्यानंतर तुम्ही आरोपी तिच्या माहेरी गेले आणि तिच्या सोबत भांडण करुन शिवीगाळ केली. तिचा मुलगा हा तुमचा मुलगा नसल्याचे तुम्ही सांगत होते. त्यानंतर तिने निशाणी क्रमांक ११ नुसार महीला तक्रार निवारण कक्ष, नंदुरबार येथे तुमच्याविरुध्द तक्रार केल्याचे तिने कथन केले आहे. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खरे नाही.

प्र.क्र. ६ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, त्यानंतर तेथे तुम्ही आरोपी हजर झाले नाहीत. म्हणुन त्यांनी तक्रार शहादा पोलिस ठाणे येथे पाठविली. त्यांनतर तिने पोलिस ठाणे शहादा येथे निशाणी क्रमांक १२ नुसार तक्रार दिल्याचे कथन केले आहे. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खरे नाही.

प्र.क्र. ७ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, तिने दाखल केलेली एफआयआर निशाणी क्रमांक १३ वर असल्याचे व त्यावर तिची सही असल्याचे तिने कथन केले आहे. तसेच गुन्ह्याच्या घटनेचा प्राथमिक अहवाल निशाणी क्रमांक १४ वर आहे. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खरे नाही.

प्र.क्र. ८ अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.२ कमलाबाई सुरेश महिरे हिच्या साक्षेत असे आले आहे की, फिर्यादी तिची मुलगी आहे तसेच तिचे पती सुरेश महीरे मयत

12/08/26

आहेत. तुम्ही आरोपी क्र. १ सोबत सन २००७ मध्ये फिर्यादीचे लग्न झाले होते. लग्नानंतर ती तुमच्या घरी नांदायला गेली होती. यावाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खरे नाही.

प्र.क्र. ९ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, सासरी तिचे सासु – सासरे, चुलत सासु – सासरे आणि ननंद व नंदोई रहात होते. सुरुवातीचे दोन ते तीन महीने तुम्ही फिर्यादीला चांगली वागणुक दिली. त्यानंतर तुम्ही आरोपींनी चारचाकी गाडी घेण्यासाठी ५०,०००/– रुपयाची मागणी केल्याचे तिने कथन केले आहे. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खरे नाही.

प्र.क्र. १० त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, तुम्ही त्यांच्यासोबत भांडण करुन त्यांना मारहाण केली होती. त्यानंतर फिर्यादी परत सासरी आली. त्यानंतर सहा महीने ती सासरी राहीली. त्यांनतर गाडी साठी तुम्ही आरोपींनी तिला पुन्हा घराबाहेर काढुन दिले. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर हे म्हणणे खरे नाही.

प्र.क्र. ११ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, त्यावेळी सदर साक्षीदार यांनी फिर्यादीला परत आणले. त्यानंतर तुम्ही आरोपी क्र.१ याने दुसरी पत्नी केली. त्यामुळे फिर्यादीने पोटगी मिळण्यासाठी न्यायालयात अर्ज केल्याचे कथन करुन पोलिसांनी तिचे बयाण घेतल्याचे तिने कथन केले आहे. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खरे नाही.

प्र.क्र. १२ अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.३ चंद्रकला सुरेश महिरे हिच्या साक्षेत असे आले आहे की, फिर्यादी तिची बहीण असुन सन २००७ मध्ये तिचे लग्न तुम्ही आरोपी क्रमांक १ सोबत झाले होते. लग्नापासून त्यांना एक मुलगा नामे

12/08/16

अविनाश सामुद्रे आहे. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. त्याबाबत माहीती नाही.

प्र.क्र. १३ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, अविनाश सध्या तिच्या बहीणीसोबत राहतो. लग्नानंतर फिर्यादी तुम्ही आरोपीच्या घरी नांदायला गेली. परंतु, तुम्ही तिच्याकडे लक्ष देत नव्हते तसेच तुम्ही नेहमी बाहेरगावी राहायचे आणि फिर्यादी घरी राहत असल्याचे तिने सांगितले केले आहे. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खरे नाही.

प्र.क्र. १४ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, त्यानंतर फिर्यादी माहेरी परत आली होती. मुलगा दोन–तीन महिन्याचा असताना तुम्ही आरोपी माहेरी आले आणि तिला परत नांदण्यास घेवून गेले. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर हे म्हणणे खरे नाही.

प्र.क्र. १५ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, तरीपण, तुम्ही तिच्याकडे व मुलाकडे लक्ष देत नव्हते. त्यानंतर तिच्या बहीणीने तुमच्याविरुध्द खटला दाखल केल्याचे सांगुन पोलिसांनी तिचे बयान घेतल्याचे तिने सांगितले. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खरे नाही.

प्र.क्र. १६ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, फिर्यादी लग्नानंतर तुम्ही आरोपीच्या घरी नंदुरबार येथे नांदायला गेली होती तेथे तुम्ही आरोपी क्रमांक १ ते ७ हे एकत्र राहत होते. तुम्ही तिला दोन महिने चांगली वागणूक दिल्यानंतर चारचाकी वाहन घेण्यासाठी पन्नास हजार रुपयांची मागणी केली होते. तिची आर्थिक परिस्थीती चांगली नसल्यामुळे पैसे दिले नाही. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खरे नाही.

12/08/20

प्र.क्र. १७ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, त्यामुळे तुम्ही आरोपी क्रमांक १ ने फिर्यादीला हाताबुक्क्यांनी मारहाण केली व घरातून हाकलून दिले व जिवे मारण्याची धमकी दिल्याचे कथन करुन तेंव्हापासून फिर्यादी माहेरी राहत असल्याचे सदर साक्षीदाराने सांगितले आहे. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर हे म्हणणे खरे नाही.

प्र.क्र. १८ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, दिनांक १९/०७/२०१८ रोजी सकाळी १०–०० वाजता ती घरी असताना तुम्ही सर्व लोक प्रकाशा येथे आले व फिर्यादीने न्यायालयात केस का केली असे सांगुन तुम्ही आरोपी क्रमांक १ ने फिर्यादीला हाताबुक्क्यांनी मारहाण केली. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खरे नाही.

प्र.क्र. १९ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, त्यावेळी शेजारच्या लोकांनी फिर्यादीला तुमच्यापासून सोडविले. त्यामुळे फिर्यादीने नंदुरबार येथे पोलिस ठाण्यामध्ये तक्रार दाखल केल्याचे तिने सांगितले. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खरे नाही.

प्र.क्र. २० अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र. ४ सुनिल भाईदास पिंपळे याच्या साक्षेत असे आले आहे की, दिनांक १३/११/२०१८ रोजी पोलिसांनी त्यांना प्रकाशा येथे फिर्यादीच्या घरी बोलाविले होते. आंबेडकर नगर, प्रकाशा येथे सुरेश महिरे यांच्या घरी फिर्यादीला मारहाण झाली होती. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खरे नाही.

प्र.क्र. २१ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, त्या जागेवर पंचनामा केला होता. घटनास्थळावर फिर्यादीचे पत्र्याचे घर आहे. घराला लाकडी दरवाजा आहे.

घटनास्थळाच्या उत्तरेकडे घराचा दरवाजा आहे. त्यानंतर पोलिसांनी त्यांच्यासमक्ष निशाणी क्रमांक १९ नुसार घटनास्थळ पंचनामा तयार केला होता. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खरे नाही.

प्र.क्र. अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र. ५ किशोर जतीलाल चित्ते याच्या साक्षेत असे आले आहे की, दिनांक १३/११/२०१८ रोजी पोलिसांनी त्यांना सुरेश महिरे यांच्या घरी बोलाविले होते. त्याठिकाणी भांडण सुरु होते. पोलिसांनी त्यांच्यासमक्ष निशाणी क्रमांक १९ नुसार घटनास्थळ पंचनामा तयार केला व त्यावर त्यांनी सही केल्याचे त्यांनी सांगितले आहे. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खरे नाही.

प्र.क्र. २२ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, घटनास्थळ सुरेश महिरे यांचे राहते घर होते. घरामध्ये कपाट, टि.व्ही., किचनमध्ये गॅस शेगडी होते. घटनास्थळावरील घर हे पक्के घर असून त्यावर पत्रे टाकले होते. घटनास्थळावरील घराचा दरवाजा उत्तर दिशेला असल्याचे त्यांनी सांगितले आहे. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर हे म्हणणे खरे नाही.

प्र.क्र. २३ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, तसेच घराच्या समोर पडीत जागा असुन सदर पडीत जागेच्या बाजुला जगन्नाथ यांचे घर आहे. सुरेश महिरे यांच्या घराच्या दक्षिणेला टॉयलेट बाथरुन असुन पडीत जागा आहे. पुर्वेला सिताराम महिरे यांचे घर तस पश्चिमेला राजेंद्र महिरे यांची घर आहे. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर हे म्हणणे खरे नाही.

प्र.क्र. २४ अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र. ६ वंदना राजेंद्र महिरे हिच्या साक्षेत असे आले आहे की, ज्योती महिरे ही तिची पुतणी असुन तिचे लग्न सन २००७ मध्ये

12/08/20

तुम्ही आरोपी अशोक सामुद्रे यांच्या सोबत प्रकाशा येथील केदारेश्वर मंदिरात झाले होते. लग्नानंतर ज्योती ही भोई कॉलनी, नंदुरबार येथे नांदण्यासाठी गेली होती. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खरे नाही.

प्र.क्र. २५ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, त्यावेळी तिच्या कुटूबांत तीचे सासु–सासरे, नणंद, नंदोई राहत होते. तुम्ही तिच्याकडे गाडी खरेदी करण्यासाठी पन्नास हजार रुपये मागत होते व तिला मारहाण करीत होते. तिचे आई–वडील गरीब असल्यामुळे पैसे दिले नाही त्यामुळे तुम्ही तिला मारहाण करीत असल्याचे तिने सांगितले आहे. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खरे नाही.

प्र.क्र. २६ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, ज्योतीला मुलगा झाला. दोन वेळा ती सासरी परत गेली होती. परंतु, तुम्ही आरोपींनी तिला सासरी घेतले नाही. तेंव्हापासून ती माहेरी राहत असल्याचे देखील तिने कथन केले आहे. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खरे नाही.

प्र.क्र. २७ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, ज्योतीचे लग्न झाल्यानंतर ती सासरी गेली त्यावेळी तिला लक्षात आले की, ती तीच्या पतीची तिसरी पत्नी आहे. ज्योतीच्या पतीची पहिली पत्नी सुनिता असुन दुसरी पत्नी मरण पावली होती. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खरे नाही.

प्र.क्र. २८ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, दिनांक १९/०७/२०१८ रोजी सकाळी १०–०० वाजता ज्योतीच्या माहेरी तुम्ही सर्व लोक आले व कोर्टातील केसमध्ये त्यांना वॉरंट निघाला आहे, ती केस मागे घे नाहीतर, तुला मारुन टाकेन असे म्हणून तुम्ही ज्योतीला हाताबुक्क्यांनी मारहाण केली.

12/08/2016

याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खरे नाही.

प्र.क्र. २९ अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.८ रमण मौडया वळवी याच्या साक्षेत असे आले आहे की, दिनांक १३/११/२०१८ रोजी ते शहादा पोलिस ठाणे येथे पोना या पदावर कार्यरत असतांना त्यादिवशी दुपारी १ वाजेपासून रात्री ८ वाजेपर्यंत पोलिस ठाणे अंमलदार म्हणून कर्तव्यावर होते. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खरे नाही.

प्र.क्र. ३० त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, प्रकाशा दुरक्षेत्र येथे सपोनि पांडुरंग गवळी यांनी फिर्यादी ज्योती सामुद्रे हिची तक्रार घेतली. पांडुरंग गवळी आणि फिर्यादी ज्योती सामुद्रे हे पोलिस ठाणे शहादा येथे हजर झाले. प्रभारी अधिकारी पोनि शहादा यांच्या आदेशाने त्यांनी गुन्हा दाखल केला होता. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खरे नाही.

प्र.क्र. ३१ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि पांडुरंग गवळी यांच्याकडे दिला. त्यांनी निशाणी क्रमांक १२ वरील फिर्याद व निशाणी क्रमांक १३ वरील एफ.आय.आर. न्यायालयासमक्ष ओळखली आहे. त्यावर त्यांची व फिर्यादीची सही असल्याचे त्यांनी सांगितले. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खरे नाही.

प्र.क्र. ३२ अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.९ गौतम उमराम बोराळे याच्या साक्षेत असे आले आहे की, दिनांक १४/०६/२०१९ रोजी ते शहादा पोलीस स्टेशन अंतर्गत प्रकाशा दुरक्षेत्र येथे कार्यरत होते. त्या दिवशी गु.र.नं. ४२३/२०१८ दाखल होऊन त्याचा पुढील तपास लेखी आदेशान्वये त्यांच्याकडे दिला. याबाबत

12/08/ 19

तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खरे नाही.

प्र.क्र. ३३ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, त्यानंतर त्यांनी सदर गुन्हयाकामी तुम्ही आरोपी क्रमांक १ चा शोध घेतला असता, तुम्ही मिळुन आले नाही. त्यानंतर त्यांनी आरोपी क्रमांक ४, ५ व ७ यांना नोटीस काढली. त्यानंतर तुमच्याविरुध्द फौ.प्र.सं.कलम २९९ प्रमाणे व ईतर आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खरे नाही.

प्र.क्र. ३४ साक्षीदार तुमच्याविरूध्द का सांगतात ?

उत्तर. खोट्या गुन्हा मध्ये अडकवण्यासाठी खोटी केस केली आहे.

प्र.क्र. ३५ तुम्हाला स्वतःला शपथेवर साक्ष द्यावयाची आहे काय किंवा इतर कोणाला साक्षीदार म्हणून तपासावयाचे आहे काय ?

उत्तर. नाही.

प्र.क्र. ३६ या प्रकरणाबाबत तुम्हाला आणखी काही सांगावयाचे आहे काय ?

उत्तर. खोटी केस माझ्यावर करण्यात आली आहे.

[signature]

आरोपीची सही / अंगठा

[signature] 12/08/26

(दीपक दा. कर्वे)

दिनांक : १२/०८/२०२६

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
शहादा, जि. नंदुरबार.

नि.फौ.ख.क्र.१५५/२०१९ MHNB060017692019

सरकार वि. अशोक सामुद्रे नि.क्र.४२/क

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, आरोपीचा जबाब माझ्यासमक्ष नोंदविला असून त्यातील मजकूर हा आरोपीने कथन केल्याप्रमाणे खरा व बरोबर आहे.

दिनांक : १२/०८/२०२६

12/08/26

(दीपक दा. कर्वे)
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
शहादा, जि. नंदुरबार